जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -१९१ दिनांक - २२/०३/२०२५

**अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर**

# परारज्यातुन येवुन गांज्याची विक्री करणारा इसम जेरबंद

आज दिनांक २२/०३/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक १ गुन्हे शाखा पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना हॅण्डल्युम हाऊस शॉपच्या समोर, शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे सार्वजनीक रोडवर इसम नामे **नदिम मोईज शेख वय २८ वर्षे, रा. जुना मायलोर, हनुमान मंदिरा जवळ, बिदर, कर्नाटक,** हा इसम त्याचे जवळील स्विफ्ट डिझायर गाडी मध्ये संशयस्पदरित्या बसलेला मिळुन आल्याने सदर ठिकाणी झडती घेतली असता त्याचे **गाडीच्या डिक्की मध्ये १२,००,७४०/- कि.चा चार नायलॉनच्या पोत्यामध्ये भरलेला ३० पॅकेट असा एकुण ६० किलो ०६७ ग्रॅम वजनाचा गांजा मिळुन आल्याने, सदर मालासह स्विफ्ट डिझायर गाडी व मोबाईल असा एकुण १७,१०,४४०/- रु .किं मुद्देमाल** जप्त करण्यात आला.

सदर इमसा विरुध्द स्वारगेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा इसम हा मुळचा कर्नाटक राज्यातील असुन त्याने सदरचा गांजा कोठुन आणला व कोठे विक्री करणार होता याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.अमितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त श्री.रंजन शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री निखील पिंगळे, मा.सहा पो.आयुक्त,गुन्हे २ श्री.राजेन्द्र मुळीक यांचे मार्गदर्शना खाली अंमली पदार्थ विरोधी पथक,१ गुन्हे शाखा पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उल्हास कदम, सहा पोलीस निरीक्षक अनिकेत

पोटे, पोलीस उप निरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलीस अंमलदार, विशाल दळवी, सचिन माळवे, संदिप शिर्के, सुजीत वाडेकर, मारुती पारधी, प्रविण उत्तेकर संदेश काकडे, दत्ताराम जाधव, यांनी केली आहे.

